वि.दि.दा.क्रं.१४/२०१९
सय्यद वि.शिवाजी

## नि.क्रं. ८४ खाली आदेश

वादीने अर्ज देऊन नमूद केले की, नि.क्र. ७० वर नोंदविलेल्या प्रतिवादीच्या उलटतपासात दि.०९/०८/२०१६ रोजीच्या नि.क्रं.५२ या पावतीवर आपली सही नाही असे नमूद करुन त्या कारणासाठी हस्ताक्षर तज्ञांकडे पडताळणीसाठी सही पाठविण्यास तयार असल्याचे कथन केले. त्यानुसार हस्ताक्षर तज्ञांकडे पडताळणी करुन त्याचा अहवाल नि.क्रं.७९ न्यायालयाला प्राप्त झाला आहे. सदर अहवाल शाबित करणे आवश्यक असल्याने वादीचा पुरावा सुरु करण्यास परवानगी असावी व साक्षीदारास समन्स करावे अशी विनंती करण्यात आली.

२. प्रतिवादीने दिलेल्या म्हणण्यानुसार वादीने आपला तोंडी पुरावा नि.क्रं.६८ प्रमाणे बंद केला असून अधिकचा पुरावा देण्यासाठी राखून ठेवला नाही. प्रतिवादीने दिलेल्या कबुल्या याकामी उपयोगाच्या नाहीत. हस्ताक्षर तज्ञांचा अहवाल प्रतिवादीने नाकारला असून त्याची साक्ष कायदयाने नोंदविता येणार नाही. पुरावा पुन्हा करण्यासाठी संयुक्तीक कारण नाही. त्यामुळे निव्वळ प्रकरण प्रलंबीत ठेवण्यासाठी दिलेला अर्ज फेटाळावा अशी विनंती करण्यात आली.

३. युक्तीवाद ऐकला. प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री.घोगरे यांनी नि.क्रं.५२ या पावतीबद्दल वादपत्रात कथन नाही असे कथन केले. त्यामुळे अर्ज रद्द करावा अशी विनंती केली.

४. नि.क्रं.७९ लगत हस्ताक्षर तज्ञांचा अहवाल प्राप्त असून नि.क्रं.८० वर वादीने तो मान्य केला व नि.कं.८१ वर प्रतिवादीने तो अमान्य केला आहे. नि.क्रं.५२ या पावतीवर आपली सही नसल्याचे प्रतिवादीने सांगितल्याने त्याच्या सांगण्यानुसार सदर सही तपासणीसाठी पाठविण्यात आली. वाद कलम १४ मध्ये दि.०९/०८/२०१६ रोजी

प्रतिवादीने रु.  दोन लाख स्वीकारुन खरेदीपत्र करुन देण्याचा कालावधी वाढवून घेतला असे उल्लेख आहे.

**५.** वादीस तज्ञ अहवाल नि.क्रं.७९ मान्य असून प्रतिवादीस तो अमान्य आहे. सदर तज्ञांच्या नेमणूकीबाबत प्रतिवादीने संमती दिली असल्याने दस्त तपासणीसाठी पाठविला होता.  त्यामुळे तो तपासणी करुन आल्यावर त्यावर प्रतिवादीने नकारार्थी मत नोंदविले. सदर तज्ञ साक्षीदाराची तपासणी करुन त्याच्याकरवी तो अहवाल शाबित करुन घेणे वादीचे काम आहे.

**६.** वादीचा पुरावा संपला असला तरीही संपरीक्षा न्यायालयामध्ये  उभय पक्षांना पुरेपुर संधी उपलब्ध असणे आवश्यक आहे. त्यामुळे वादीस पुढील पुरावा देण्याची संधी देण्यात येते. मात्र वादीने रक्कम रु.१०००/- आज न्यायालयात कॉस्ट म्हणून भरावी असे आदेशीत करण्यात येते. कॉस्ट भरल्याबद्दल सहा.अधिक्षकांचा अहवाल प्राप्त झाल्यावर तातडीने हस्ताक्षर तज्ञ यांना आवश्यक तो भत्ता भरुन साक्षीसमन्स काढावे आणि त्यांनी येताना वर नमूद नि.क्रं.५२ या पावतीच्या अनुषंगाने त्यांच्याकडे असलेली सर्व कागदपत्रे सोबत घेऊन यावेत असे समन्समध्ये नमूद करावे.

स्वाक्षरीत/-

**[एस.एन.सरडे]**

दि.२९/०१/२०२६ दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहमदपूर.